इलेक्ट्रॉनिक्स : एक छंद
प्रारंभ आणि प्रवास

१९७० सालची गोष्ट. बाजारपेठेंतील एका वयस्कर गृहस्थांच्या जागेंत पूर्वी कांहीं वर्षें मी भाडेकरी होतो. त्या बरेच दिवसांच्या परिचयामुळें त्यांना माझ्याविषयीं फार आपुलकी व आदर होता.

नंतर मी चिंचवडला राहण्यासाठीं गेलो. एकदां कांहीं कामानिमित्तानें तळेगांवांत आल्यावर मला बाहेरून कळले कीं, त्यांनी टेपरेकॉर्डर घेतला आहे. म्हणून त्यांच्याकडे गेलो. पहिली ओळख तर होतीच. मला बरेच दिवसांनी पाहिल्यावर त्यांना फार आनंद झाला. ‘‘ तुम्ही टेपरेकॉर्डर घेतला असे मला कळले, तेव्हां तो कसा असतो ते पहावे म्हणून आलो होतो.’’ ‘‘पहा ना’’ असे म्हणून कपाट उघडून त्यांनी तो बाहेर काढला. मी बापजन्मीं कधी पाहिला नव्हता. खरे सांगू! मी इतका विस्मयचकित झालो कीं, मला वाटलें त्यांनी कपाटांतून आठवें आश्चर्य बाहेर काढलें.

एखाद्या तान्ह्या पोराला हाताळावे तसा तो कपाटांतून हळूच बाहेर काढून अतिशय हलक्या हाताने कॅसेट टाकून त्यांनी तो चालू केला. ती छोटी रिळें फिरत होती आणि आवाजहि येत होता. रिळें फिरल्याबरोबर आवाज कसाकाय येतो याविषयीं कल्पना करणेंहि शक्य नव्हते इतके तें गूढरम्य वाटत होतें.

गंमत अशी कीं, त्या अर्ध्या तासांत त्यांनी मला टेपरेकॉर्डर जवळहि जाऊं दिले नाही, मग हात लावणें तर दूरच राहिले. त्या अर्ध्या तासांत ते फारच हळवे झालेत असे मला जाणवले. कारण काय तर एवढ्या महागामोलाची वस्तू, जणूं स्वर्गीय यंत्रणा! कांहीं कमीजास्त झाले म्हणजे नसती बलामत होईल म्हणून ते फार दक्ष आणि सावध दिसत होते. त्यांनी मला तो दाखविला, इतकेच नव्हें तर तो लावून दाखविला हेच कोण महत् उपकार होते त्यांचे! तान्ह्या बाळाला दाखवितात पण दुसऱ्यांच्या हातांत देत नाहीत कारण घेतां करतांना त्याची मान अवटाळली तर नसती पंचाईत व्हायची तसे त्यांचें वागणें वाटत होतें. १९७० साल होतें तें. कॅसेटचें प्रथमचें दर्शन, टेपरेकॉर्डरचें प्रथमचें दर्शन, त्यावेळीं सृष्टीच्या आणि मानवी बुद्धीच्या गूढ

रहस्यानें आश्चर्यचकित झालेली मनाची ती अवस्था कधीहि विसरणें शक्य नाही. तें रहस्य इलेक्ट्रॉनिक्सच्या अत्यंत गहनगंभीर थिअरीमध्यें शिरून आजघडीलाहि तसेच जिवंत राहिले आहे. म्हणूनच कांहीं जरूरी नसतां मी हें विस्तृत लेखन करूं शकतो — अतिशय तन्मयतेनें.

सर्वप्रथम कॅसेट बाजारांत विक्रीसाठीं आल्या त्यावेळीं लोकांच्या आश्चर्याला पारावार राहिला नव्हता. १/२ वर्षें तो चर्चेचा विषय झाला होता.

ज्यावेळीं यू.डी.सी.क्लार्कचा पगार ५००रूपयापेक्षां जास्त नव्हता, अशा त्यावेळीं टेपरेकॉर्डरची किंमत १५०० रूपयांच्या आसपास होती. त्यामुळें ज्यांची आर्थिक स्थिती चांगली असे, असेच लोक तो खरेदी करीत असत. एखाद्याने तो विकत घेतला म्हणजे सोन्याप्रमाणें कपाटांत ठेवून आणि कपाटाला कुलूप लावून तो माणूस किल्ली सदैव कमरेला वागवीत असे. त्याने ऐरावत खरेदी केला आहे असें त्याला स्वताला वाटे आणि इतर लोकहि त्याच नजरेने त्याच्याकडे पाहत असत. आतां त्याचें हसूं येतें.

त्यावेळीं एकदां एक कॅसेट दुसऱ्याला देण्यासाठीं माझ्या हातीं आली. असली वस्तूं

आयुष्यांत कधी पाहिली नव्हती. बहुमूल्य रत्न पाहिल्यावर जसें होतें तसा मी महदाश्चर्यांत पार बुडून गेलो. ती थोडी पारदर्शक होती त्यामुळें त्यांतील सगळ्या गोष्टी दिसत होत्या. छोटी दोन चक्रें, त्यावर ध्वनिफीत उलघडली आणि गुंडाळली जात होती. ही चक्रें फिरल्यावर आवाज कसाकाय येतो याविषयीं कल्पनाहि करता येणें शक्य नव्हतें इतके तें गूढ वाटत होतें. आपणास ही वस्तूं पाहण्यास मिळाली म्हणून स्वतास धन्य समजत होतो.

शास्त्रज्ञ जरी असला तरीहि एकंदर मानवी बुद्धीच खरोखर विलक्षण वस्तूं आहे. ती किती अद्‌भूत आणि आश्चर्यकारक विश्व निर्माण करतें! आणि त्याचें अवलोकन केल्यावर किती अपूर्व समाधान लाभतें!

ज्या गोष्टी तयार करण्यांत मानवी बुद्धीची प्रभा, तिचें तेज, वैभव प्रकट होतें, त्या पाहण्याचें, नीट सर्व बाजूंनी अवलोकन करण्याचें विलक्षण वेड माझ्यांत आहे. असें हें अद्‌भूत बुद्धीकौशल्य आणि त्याने निर्माण केलेलें हें विज्ञानविश्व, याचें हितीहि अवलोकन केलें तरी माझें समाधान होत नाही. त्याचा महिमा गरिमा

जसजसे अवलोकन करावे तसतसा उत्तरोत्तर अधिकाधिक जाणवूं लागतो.

सृष्टी तर विस्मयकारक आहे — निःसंशय. मात्र शास्त्रज्ञांनी निर्माण केलेलें हें विज्ञानविश्व त्याहिपेक्षां विस्मयकारक वाटतें. हा मानवी बुद्धीचा चमत्कार आहे. आश्चर्य असें कीं, ही बुद्धिनिर्मिती हाहि सृष्टीचमत्कारच आहे, हे विसरता कामा नये. नाहींतर सगळे मुसळ केरांत जाईल.

निसर्गानें माणसाच्या अहंकाराला जागाच ठेवली नाही. आणि म्हणूनच मानवी कर्तृत्वाला असा हा बहर आला आहे. हें कॉन्ट्रॅडिक्शन आहे. हा विरोधाभास आहे. पण विश्वरचनेची वस्तुस्थितीच अशी आहे, त्याला कोण काय करणार! वास्तविक या गोष्टींचा उमज पडणें हेंच बुद्धिमत्तेचें लक्षण आहे.

भाग दुसरा

१९७५ सालची गोष्ट. यावेळीं मी तळेगांवांत कायमचा राहण्यासाठीं आलो. दोन दिवसांनी त्यांच्याकडे गेल्यावर आणि येथें कायमचा राहण्यास आलो आहे असें सांगितल्यावर त्यांना फार आनंद झाला. आतां त्यांनी हॉलंड

फिलिप्सचा नवीन टेपरेकॉर्डर घेतला होता. हा दुसरा कांहीं दिवसापूर्वीच त्यांनी घेतला होता.

मागील भेटींत त्यांनी मला टेपरेकॉर्डर जवळहि जाऊ दिले नाही. हात लावणे अशक्यच होते. आतां मात्र चालू करण्याचें बटन कोणते असे विचारल्यावर “ ही पाहा ही की आहे बोटाने अशी दाबा ” मला फार नवल वाटलें. आतां ते तब्बेतीने हळवे झाले होते. टेपरेकॉर्डरचा हळवेपणा केव्हांच संपला आहे असें मला जाणवले.

त्या गृहस्थांनी माझें कांहीं लेखन माझ्याच आवाजांत रेकॉर्डिंग केले. पुढेपुढे त्यांच्याकडे वारंवार जाणें होत राहिले. मी गेलो कीं, ते न चुकता टेपरेकॉर्डर बाहेर काढीत आणि त्यावर कथाकथन, कीर्तन इत्यादि विषयावरील कॅसेट्स ऐकणें व कांहीं रेकॉर्डिंग करणें असे कार्यक्रम कांहीं वर्षे चालूं होते. मी गेलो कीं, त्यांना फार बरें वाटत असे. न चुकता ते रोज माझ्यासाठीं घरांत चहा करण्यास सांगत. “ तुम्ही रोज चहा देतां हें कांहीं खरें नाही ” असे एकदां म्हटल्यावर त्यांनी माझे दोन्ही हात हातांत घेतले आणि म्हणाले, “ मला फार समाधान वाटतें हो. तुम्ही असे कांहीं समजूं नका आणि मला दुःखी

करू नका ” माझा नाइलाज झाला. एकदां ३/४ दिवस मला त्यांच्याकडे जाण्यास जमलेच नाही. पाचव्या दिवशीं ते माझ्या धरीं आले. फारच उदास वाटले ते त्यावेळीं! मी कारण सांगितल्यावर म्हणाले, “ ठीक आहे, आज मात्र नक्की या बरं का ” त्यावेळीं त्यांचे डोळे पाण्याने डबडबले. माझ्या हृदयांत फार कालवाकालव झाली. या माणसाचा मी खरोखरच फार अपराध केला आहे असे मला तेव्हां प्रकर्षाने जाणवले. त्यानंतर मात्र न चुकता त्यांच्याकडे जात असे. कामाच्या व्यापांत असलो तरी त्यांना न चुकता उभ्या उभ्या भेटत असे.

एकदां पेठेला गेलो असतां रस्त्यांतच ते मला दिसले. खूप अशक्त वाटत होते! मी जवळ गेल्यावर त्यांनी मला पाहिले आणि रडायलाच लागले. “ काय झाले हो? ” त्यावर ते म्हणाले, “ सकाळीं रेडिओवर एक गाणें लागले ‘ ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ’ आतां माझ्या मनाला कोण न्हाऊ घालील! ” “ मी आहे ना, काळजी करूं नका. ” त्यांना जरा धीर आला. पार खचत्यासारखे झाले होते ते. त्यांना धरून माझ्या घरीं आणले. कॉटवर बसवून थोडे खाण्यासाठीं दिले आणि केवळ दुधाचा चहा

केला. चहा फार छान झाला म्हणाले. नंतर गप्पा गोष्टी, कांहीं विनोद झाले. ते फार हंसले. त्यांच्या मनावरचें मळभ दूर झाले. आता ते खूपच प्रसन्न दिसत होते. नंतर त्यांना घरीं सोडले. म्हणाले, माझ्या शेवटच्या आयुष्यांत तुम्ही मला देव भेटलात. माझ्या पायाच पडायला लागले ते! म्हणालो, “ हे भलतेच काय करतां? तुम्ही माझ्यापेक्षां वयाने मोठे आहात ” “ आम्ही केवळ वयाने वाढलो. तुमची योग्यता फार मोठी आहे. ”

ते गृहस्थ आज हयात नाहीत. इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रान्तांत त्यांच्यामुळें माझें पहिलें पाऊल पडलें. त्यांना विसरणें कधीहि शक्य नाही.

मात्र त्यांच्या हयातींत २/३ वर्षांत टेपरेकॉर्डर आणि टी. व्ही. मधील माझें स्वतंत्र प्रयोग त्यांनी पाहिले. माझ्या इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रांतील या जगावेगळ्या प्रगतीचा त्यांना फार विस्मय आणि अभिमानहि वाटत असे. मी त्यांना म्हणत असे कीं, तुम्ही या क्षेत्रांतील माझें पहिले गुरू आहात. त्यावेळीं ते क्षूप हंसायचे आणि अगदी बारिक चेहरा करून म्हणायचे, “ तुम्ही केवढी प्रगती केली हो! मला यांतले कांहींच कळत नाही. मी कसला गुरू!” तरीहि मी त्यांना

नि:शंकपणें सांगत असे कीं, तुम्ही कांहींहि म्हणालात तरी तुमचें गुरूस्थान माझ्या हृदयांत अढळ आहे आणि आज घडीलाहि तें तसेच आहे. त्यांच्या ऋणांतून कधी उतराई होता येणार नाही. तें सदैव शिरीं राहील.

माझ्या इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रदीर्घ छंदाविषयीं लिहिण्यास बसलो आणि अचानक अतिशय तीव्रतेने त्यांचें स्मरण झालें. अशा रीतीने अभावितपणें त्यांना श्रद्धांजली वाहून मी माझ्या लेखनाचें हें असें गणपती पूजन केलें आहे.‘ माणसे जातात पण त्यांचे गुण ध्रुवताऱ्याप्रमाणे सदैव चमकत असतात हेच खरे!’

कृष्ण गोकुळांतून मथुरेस जाण्यास निघाला त्यावेळीं राधा अतिशय व्याकूळ झाली. कृष्ण निघाला, त्याचा रथ दृष्टिआड गेलादेखील. राधा कृष्णाच्या पुष्कळच निकट होती. त्याला अखेरचा डोळेभरून पहावा अशी तीव्र आस तिला होती. आणि तरीहि राधा कृष्णाला पाहू शकली नाही. कुणीतरी तिला विचारले, “ काय गे राधे, तूं कृष्णाला पाहूं शकली नाहीस, असे म्हणतेस, हें कसे ग?” त्यावर तिने उत्तर दिले, ‘अभागिनीच्या उभय लोचनीं जलधारांचा होता पडदा’ माझी स्थिती अगदी अशीच झाली आहे. लिहिण्याचें

जमतच नाहीं. तेव्हां येथेंच थांबतो. उद्यापासून सुरूं करतो.

इति

आप्पा ठोंबरे.

८/८/२००४